http://www.epitomejournals.com, Vol. 3, Issue 11, November 2017, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research

ISSN : 2395-6968

# भारताच्या स्वातंत्र्यात लार्ड माउंटबॅटनची भूमिका



प्रा. डॉ. संतोष शंकरराव इंगोले

श्री. तुळशीरामजी जाधव कला व विज्ञान

महाविद्यालय वाशीम

## ABSTRACT

ब्रिटिश सरकारने भारताच्या सत्तांतराची जबाबदारी सोपविलेल्या “व्हॉईसरॉय लार्ड माउंटबॅटन 22 मार्च 1947 रोजी दिल्ली येथे आला तो भारताचा शेवटचा गव्हर्नर जनरल होता. 24 मार्च रोजी त्याचा शपथविधी संपन्न झाला. यावेळी जुन 1948 पर्यंत सत्तांतराचा पुनरूच्चार केला व यासाठी भारतीयांना सहकार्याचे आवाहन केले.”[1] माऊटबॅटन यांनी भारतीयांना स्वातंत्र्य द्यावे असे ब्रिटिश सरकारने सूचविले. त्याचबरोबर त्याला मार्गदर्शनपर सूचनापत्र देण्यात आले. त्यामध्ये “त्रिमंत्री योजनेप्रमाणे संघराज्य स्थापन करणे व त्याला ब्रिटिश राष्ट्रकुलात ठेवावे. 01 ऑक्टोंबर पर्यंत तडजोड झाली नाही तर ठरलेल्या तारखेच्या आत सत्तांतराचा निर्णय घ्यावा. व जून 1948 पर्यंत सत्तांतर करण्याचा उद्देश असावा. ज्याच्या हाती सत्ता सोपवायच त्यांच्याशी संस्थानिकांनी आपले धोरण ठरवावे. संस्थानामध्ये लोकशाही आणण्यास मदत करावी. हंगामी सरकारशी वसाहतीच्या सरकारप्रमाणे चर्चा करण्यात येईल. हिन्दी महासागराच्या सुरक्षिततेच्या व्यवस्थेत सहकार्याची गरज आहे. म्हणून तशी तरतूद इंग्लडशी होणाऱ्या करारात करावी.”[2] अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या. या सूचना म्हणजे माउंटबॅटन यांच्यासाठी भारतात काम करण्याचा मार्ग होता.

या धोरणानुसार माऊटबॅटनला काम करायचे होते. या सूचनेवरून असे म्हणता येते की, ब्रिटिशाला भारताचे अनेक भागात विभाजन करायचे होते. त्याचबरोबर अमेरिकेच्या सल्ल्यावरून आग्नेय आशियात प्रभाव ठेवण्यासाठी भारतातील कराची व कलकत्ता बंदरे आपल्या ताब्यात असावी असा प्रयत्न ब्रिटिशांचा होता. म्हणजेच दुसऱ्या महायुध्दानंतरही इंग्लडला भारतातील नव्हे तर आग्नेय आशियातील आपले संबंध सुरक्षित राहतील याची खबरदारी घ्यावयाची होती. हे वरील सुचनेवरून दिसून येते.

## KEYWORDS

ब्रिटिश सरकार, माऊटबॅटन, सत्तांतर, लोकशाही, महायुध्द

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

शपथविधी संपन्न झाल्यावर माउंटबॅटन यांनी आपल्या कामाला सुरूवात केली. त्यांच्याविषयी त्यांचा चरित्रकार झिगलर म्हणतो, ''त्याच्यात मोठे दोष होते, लहान मुलासारखा गर्व होता. त्याची महत्त्वाकाक्षा उत्तुंग होती. त्यांच्या हातात एखादे सत्य गेले की, त्याचे रूपांतर हवे तसे करीत असे, कोणाचाही भिडर्मूत न बाळगता इतिहासाचे पूर्वलेखक करायचे होते. जे जे साध्य केले ते मोठे करून सांगायचे होते.''[3] अशाप्रकारचे माउंटबॅटन यांच्या स्वभावाचे वर्णन केले आहे. त्याच्या स्वभावात काही दोष आहे असे म्हटले तरी त्यांच्यावर जबाबदारी मोठी आलेली होती. त्यामुळे एकच आव्हान समोर होते ते म्हणजे सत्तांतराचे.

माऊंटबॅटन यांचा पहिला आराखडा नेहरूंना मान्य झाला नाही, त्यामुळे नेहरूंच्या पत्रातील मुद्याचा विचार करून नवी योजना तयार करण्याचे काम सचिव मंडळाकडे सोपविण्यात आले. यामध्ये त्यांचे घटनात्मक सल्लागार व्ही. पी. मेनन यांची मदत झाली. मेनन यांनी वसाहतीच्या स्वराज्याच्या तत्त्वावर दोन केंद्र सरकारकडे सत्ता द्यावी. त्यामुळे देशाचे अनेक तुकडे होण्यापेक्षा मोठया प्रमाणात ऐक्य टिकुन राहिल. तसेच  व्ही. पी. मेनन यांनी तयार केलेला आराखडा माउंटबॅटन यांनी स्वीकारला. त्यामध्ये ''हिन्दुस्थानची फाळणी करावी की, नाही याविषयी कार्यपध्दतीस भारतीय नेते मान्यता देत आहेत. एकच केंद्रीय सत्ता मान्य झाल्यास वसाहतीच्या तत्त्वावर घटनासमितीला सत्ता द्यावी, दोन सार्वभौम राष्ट्र असावी असे ठरल्यास दोन्ही केंद्र सरकारांनी वसाहतीच्या आधारावर सत्ता घ्यावी, 1935 च्या कायद्यातील वसाहतीच्या स्वराज्यानुसार सत्तांतर करावे, दोन्ही वसाहतीला एकच गव्हर्नर जनरल असावा, व सध्याच्या गव्हर्नर जनरलची फेरनिवड व्हावी. प्रांताचे गव्हर्नर त्या त्या केंद्रसरकारने निवड करावी. दोन वसाहतीची राज्य निर्माण झाल्यास लष्काराची विभागणी करावी.''[4] या तत्त्वांचा समावेश करण्यात आलेला होता. ही तत्वे  पूर्णपणे व्ही. पी. मेनन यांची होती.

पहिल्या अनुभवावरून माउंटबॅटन यांनी आधी भारतीय नेत्यांची मान्यता घेण्याचे निश्चित केले. त्यासाठी काँग्रेस, मुस्लीम लीग व शीख नेत्यांना हा मसूदा दाखविण्यात आला. आणि त्यांची लेखी मान्यताही घेण्यात आली. नवा आराखडा घेऊन व्हॉईसराय लंडनच्या मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यासाठी लंडनला गेले. इंग्लडच्या मंत्रिमंडळात यावर फारसी चर्चा न होता हा आराखडा संमत करण्यात आला. माउंटबॅटन लंडनला वाटाघाटी करीत असतांना जीनांनी पूर्व व पश्चिम पाकिस्तानला जोडणारा 800 मैलांच्या भूपट्टीची मागणी केली. त्याला विरोध करण्यात आला. लंडनला गेलेल्या व्हॉईसरॉयने मंत्रिमंडळाशी चर्चा करुन ''अखेरीस माउंटबॅटन यांनी फाळणीच्या योजनेला संमती मिळविली. परत येतांना चर्चील यांचा वैयक्तिक संदेश जीनासाठी आणला. त्यामध्ये 'जर आता तुम्ही पाकिस्तान मिळविण्याची हाती आलेली संधी गमावली. तर मग काही खरे नसून ही शेवटची संधी आहे असे म्हटले.''[5] चर्चील यांच्या निरोपावरून त्यांचा जीनांच्या मुस्लीम लिगला वा जिनांच्या पाकिस्तानच्या मागणीला सतत पाठिंबा होता असे दिसून येते. हा पाठिंबा म्हणजे मुस्लीमांच्या मदतीची परतफेड होती. परंतु आता मजूर पक्षाचे सरकार असल्याने चर्चील काही करू शकणार नव्हते. त्यामुळे त्यांनी जीनांना हा मसूदा मान्य करण्याचा सल्ला दिला.

माउंटबॅटन भारतात आल्यावर या आराखड्यावर माहिती सांगण्यासाठी ''2 जून रोजी दिल्ली येथील आपल्या निवासस्थानी भारतीय नेत्यांना बोलविण्यात आले. यामध्ये नेहरू, पटेल, कृपलानी, जीना, लियाकत अली, अब्दुल निस्तार, बलदेवसिंग यांचा समावेश होता. या बैठकीत माउंटबॅटन यांनी योजनेमागील ब्रिटिश सरकारची भूमिका विशद केली. फाळणी का आवश्यक होती. याचे तर्कशुध्द विश्लेषण दिले आणि या दोन राष्ट्रांच्या सीमा निर्धारणाचे काम करण्यासाठी तज्ञांची समिती स्थापण करण्यात येईल असे म्हटले. आणि त्यासाठी काँग्रेस व लीगला लेखी मान्यता मागितली.''[6] काँग्रेसचे अध्यक्ष कृपलानी यांनी आपली मान्यता कळविली. परंतु जीनांनी टाळाटाळ केली. त्यामुळे जीनांनी तातडीने मान्यता न दिल्यास हाती जे पडणार ते ही मिळणार नाही .असा धाक

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

माउंटबॅटनने दिला. व शेवटी 3 जूनच्या बैठकीत जीनांनी लीगच्या वतीने न बोलता व्हॉईसरॉयने बोलण्याचे ठरविले. आणि योजना लिगला मान्य आहे. असे मी म्हटल्यावर आपण होकारार्थी मान हलवा, असे जीनांना सांगितले. त्यानूसार व्हॉईसरॉने मुस्लीम लीगची याला मान्यता आहे असे म्हटले, तेव्हा जीनांनी होकारार्थी मान हलवीली.

3 जूनच्या बैठकीत फाळणीचा निर्णय झाला. या बैठकीनंतर ‘‘माउंटबॅटन यांच्या पाठोपाठ नेहरू, जिना, बलदेवसिंग या तिघांची भाषणे ऑल इंडिया रेडिओ वरून प्रक्षेपित झाली. नेहरूंनी आपल्या भाषणाच्या शेवटी ‘जय हिंद’ म्हटले. तर जिनांनी ‘पाकिस्तान जिंदाबाद’ म्हटले.’’[7] अशाप्रकारे भारताच्या स्वातंत्र्याचा व राजकीय संघर्षाचा पेचप्रसंग 3 जून रोजी झालेल्या बैठकीमध्ये संपला.

3 जून या दिवशी पंतप्रधान ॲटली यांनी माउंटबॅटन योजनाचे विधेयक कॉमन्स सभागृहात ठेवले. सभागृहात विरोधी पक्षनेते ज्यांनी भारताच्या स्वातंत्र्याला व एकात्मतेला सतत विरोध केला. त्यांनी अतिशय सौम्य शब्दात आपले मत व्यक्त केले. भारताचे स्वातंत्र्य जवळ आणणारे ॲटली आणि ते कार्य करणारे माउंटबॅटन यांनी पैसा व पाशवी बळ यामुळे नव्हे तर निर्धार व प्रामाणिकपणा, स्पष्टता यांच्या आधारावर मानवजातीची सेवा करू शकतात हे दाखवून दिले.

माऊंटबॅटन योजना :

माउंटबॅटन यांनी दुसया दिवशी पत्रकार परिषदेमध्ये बोलतांना सत्तांतर हे 15 ऑगष्ट पर्यंत केले जाईल असे जाहीर केले. माउंटबॅटन योजनेच्या स्वरूपामध्ये

‘‘1) अस्तीत्वात असलेल्या घटनासमितीचे कामकाज चालु राहील, ज्यांना ती मान्य नसेल त्यांच्यावर लादली जाणार नाही. ज्यांना अस्तित्वात घटनासमिती मान्य नाही, त्यांने स्वतंत्र्य घटना तयार करावी.

2) पंजाब व बंगाल कायदेमंडळातील सदस्यांची विभागणी दोन गटात केली जाईल. एक मुस्लीम बहुल व दुसरा गैरमुस्लीम जिल्हाचा. त्यांच्या प्रतिनिधीच्या वेगवेगळया बैठकी होतील. त्यांनी प्रांताच्या विभाजनाचा निर्णय घेवून कोणत्या घटना समितीत सामील व्हावे ते ठरवावे.

3) सिंध प्रांताने कोणत्या घटनासमितीस सामील व्हावे ते तेथील विधीमंडळाच्या बहुमताने ठरवावे.

4) वायव्य प्रांत व बलुचिस्थान यांनी सार्वमताद्वारे आपले भवितव्य ठरवावे.

5) आसाम मधील सिलहट जिल्ह्यात सार्वमत घेण्यात येईल व त्याव्यतिरिक्त प्रदेश अस्तित्वात घटना समितीच्या कक्षेत असेल.

6) संस्थानवरील ब्रिटिश सार्वभौमत्व संपल्यावर त्यांना भवितव्याचे निर्णय घेण्याचे स्वतंत्र राहील.

7) भारताची दोन स्वायत्त राज्ये निर्माण झाल्यास फाळणीशी संबंधित समस्याविषयी त्यांनी करार करावा.

8) भारतात निर्माण होणाया दोन स्वायत्त राज्यात हस्तांतरणाविषयी काही बाबी संबंधी ब्रिटिश शासनाशी करार करावा.

9) सीमा निर्धारणासाठी सीमा निर्धारण समिती स्थापण करण्यात येईल.’’[8]

या योजनेच्या स्वरूपावरून त्यामध्ये भारताची फाळणी निश्चित झाल्याचे स्पष्ट होते. ही योजना कॉंग्रेस व लीगला मान्य होती. या योजनेत संस्थानिकांना स्वतंत्र राहण्याचा अधिकार देण्यात आला. त्यामुळे भारतात दोन स्वायत्त राज्य निर्माण होणार नव्हते. तर संस्थानानांही स्वतंत्र राहण्याचा अधिकार देवून या भारताचे विच्छादन करण्यात आले. शीखांनी या योजनेचे स्वागत केले. तर हिंदू महासभेने विरोध केला. समाजवादी पक्षाने ‘‘फाळणी कॉंग्रेसच्या दुबळया व शरणागतीच्या धोरणाचा परिणाम आहे असे म्हटले.’’[9] तर साम्यवादी पक्षाने ‘‘माउंटबॅटन योजना म्हणजे फोडा आणि झोडा या धोरणाचे परिपालन आहे असे म्हटले.’’[10]

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

भारताचे विभाजन करण्याचा निर्णय ब्रिटिश राजकीय पुढायांचा होता. आणि त्यांच्या भारताविषयीच्या धोरणातून तो नेहमी दिसून येत होता, त्यामुळे स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर विभाजनाचा निर्णय भारतीय लोकांना मान्य करावाच लागेल अशी स्थीती ब्रिटीशांनी भारतात निर्माण केली होती. ही बाब ब्रिटिश भारतीयांवर लादणारच होते. म्हणजेच भारताच्या स्वातंत्र्याचा मार्ग भारताच्या फाळणीमधून जाणार होता. त्यामुळे काँग्रेस महासमितीत ‘‘स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ही योजना स्वीकारण्याखेरीज गत्यंतर नव्हते असे गोविंद वल्लभ पंत यांनी म्हटले.”[11] 14 जून रोजी झालेल्या काँग्रेस कार्यकारीणीच्या सभेमध्ये 157 विरूध्द 29 मतांनी ठराव संमत झाला.

म्हणजेच भारताच्या फाळणीची माउंटबॅटन योजना भारत व पाकिस्तान या दोन राष्ट्राच्या जन्माची योजना होती. परंतु या योजनेत मुस्लीमांना स्वतंत्र राष्ट्र मान्य केले. आता जर मुस्लीमांनी पाकिस्तानच मान्य केला नाही. तर तो त्यांना कधीच मिळणार नाही असा निरोप चर्चील यांचा जिनाला होता. पाकिस्तानच्या निर्मीतत ब्रिटिशांचा हात होता. हे सिध्द होते. त्याच बरोबर संस्थानांनाही भारत किंवा पाकिस्तान या देशात सामील होण्याचा तसेच स्वतंत्र राहण्याचा अधिकार दिल्याने भारताची अनेक राष्ट्रात विभागणी होणार होती. कारण भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी त्यांनी पूर्वीपासून राबविलेल्या धोरणानुसारच भारताचे विभाजन घडून येणार होते. याची सर्वस्वी जबाबदारी ब्रिटिशांची असलेली दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ यादी -


1. Menon v. p., 'The Transfer of Power In India', Princeton University Press America' 1957, P. 350
2. Michael Edwards., 'The Last years of British India', Allied Publisher, Private Ltd, Bombay., 1963, P.146-147
3. सिंग जसवंत., (अनुवाद) पाध्ये अशोक., ‘जिना हिन्दुस्थान फाळणी आणि स्वातंत्र,’ मेहता पब्लीकेशन हाऊस पुणे. 2010, पृ. 415
4. तळवळकर गोविंद., ‘सत्तांतर 1947’, मौज प्रकाशन पुणे, खंड 2, 1983, पृ.229
5. हार्डीकर आनंद., ‘कायदे आझम’, राजहंस प्रकाशन पुणे, 3 री आवृत्ती, 2008, पृ.337.
6. तळवळकर गोविंद., ‘सत्तांतर 1947’, मौज प्रकाशन पुणे, खंड 2, 1983, पृ.231.
7. हार्डीकर आनंद., ‘कायदे आझम’, राजहंस प्रकाशन पुणे, 3 री आवृत्ती, 2008, पृ.388.
8. वैद्य सुमन., कोठेकर शांता., ‘आधुनिक भारताचा इतिहास’, साईनाथ प्रकाश नागपूर, खंड तिन, 1993, पृ.163.
9. तळवळकर गोविंद., ‘सत्तांतर 1947’, मौज प्रकाशन पुणे, खंड 2, 1983, पृ.239.
10. तळवळकर गोविंद., ‘सत्तांतर 1947’, मौज प्रकाशन पुणे, खंड 2, 1983, पृ.239.
11. Majumadar R. C., 'History of the freedom movement in India', Firma KLM. Private Ltd. Calcutta, Volume III, Second Revised edition, 1977. P.699.


 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.